नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १३१ | Issue - 131 | वार शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ | Blow- Friday Date 27 September 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### ना. छगन भुजबळ यांची तब्येत खालावली, उपचार सुरू

पुणे : महाराष्ट्राचे अन्न, नागरि पुरवठा तसंच ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांना मुंबईतल्या बॉम्बे रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. छगन भुजबळ हे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पुणे दौऱ्यादरम्यान त्या ठिकाणी गेले होते. मात्र त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना पुण्याहून मुंबईत आणण्यात आलं. मुंबईतल्या बॉम्बे रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. डॉक्टरांच्या देखरेखीखाली छगन भुजबळ यांच्यावर उपचार सुरु आहेत. छगन भुजबळ यांना ताप आला आणि घशाचा संसर्ग झाला त्यामुळे त्यांना आज दुपारी पुण्यातून मुंबईत आणण्यात आलं. मुंबईतल्या बॉम्बे रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. छगन भुजबळ यांची प्रकृती स्थिर आहे. कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका असं छगन भुजबळ यांच्या जनसंपर्क विभागाने स्पष्ट केलं आहे.

### आरक्षणाच्या मागणीवरून दोघांनी नदीत घेतली उडी

नगर: धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण, तसेच आरक्षणाचे प्रमाणपत्र मिळावे या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या दोघांनी नेवासा तालुक्यातील प्रवरा संगम येथे गुरुवारी गोदावरी नदीपात्रात उडी घेऊन जलसमाधी घेतल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सायंकाळी उशिरापर्यंत या दोघांचा शोध घेतला जात होता.

शोधकार्यासाठी 'एनडीआरएफ'च्या पथकाला पाचारण केल्याची माहिती उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी दिली. प्रल्हाद चोरमारे (रा. छत्रपती संभाजीनगर) व बाळासाहेब कोळसे (रा. पाथर्डी, नगर) अशी उडी मारणाऱ्या आंदोलकांची नावे आहेत.

# बिहारमध्ये ३७ मुलांसह ४९ जणांचा बुडून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पाटना: बिहारमध्ये 'जीवित्पुत्रिका' उत्सवादरम्यान मृत्यूचे तांडव पहायला मिळाले. जीवित्पुत्रिका ज्याला स्थानिक भाषेत जीतिया देखील म्हटले जाते. हा उत्सव साजरा करताना संपूर्ण राज्यात विविध जिल्ह्यात झालेल्या वेगवेगळ्या घटनेत एकूण ४९ जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आहे. धक्कादायक म्हणजे यात ३७ लहान मुलांचा समावेश आहे. या घटना राज्यातील वेगवेगळ्या १५ जिल्ह्यात घडल्या आहेत.

'जीवित्पुत्रिका' उत्सवादरम्यान महिला आपल्या मुला-मुलींच्या दीर्घायुष्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी निर्जला उपवास करतात आणि पवित्र स्नान करतात. हा उत्सव बिहार, झारखंड आणि उत्तर प्रदेशमधील पूर्वांचल भागात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

**'जीवित्पुत्रिका' उत्सवादरम्यान घडली दुर्दैवी घटना**

डीएमडीने दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत ४३ मृतदेह सापडले असून तपास मोहिम सुरू आहे. या घटना राज्यातील पूर्व आणि पश्चिम चंपारण, नालंदा, औरंगाबाद, कैमूर, बक्सर, सीवान, रोहतास, सारण, पटना, वैशाली, मुझफ्फरपूर, समस्तीपूर, गोपालगंज आणि अरवली जिल्ह्यात उत्सव साजरा करताना नदी आणि तलावात बुडून झाल्या आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी ८ तलावात स्नान करताना बुडल्याने ८ जणांचा मृत्यू झाला. यात २ महिला आणि ६ लहान मुलांचा समावेश आहे. या घटना जिल्ह्यातील बारूम प्रखंडच्या इटहट गावात आणि मदनपूर प्रखंडच्या कुशा गावात झाल्या. मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी मृतांच्या नातेवाईकांना चार लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. राजधानी पाटनाच्या बिहटा पोलिसा ठाण्याच्या क्षेत्रात सोन नदीच्या घाटावर बुधवारी संध्याकाळी स्नान करण्यासाठी गेलेली एका महिलेचा तिच्या १४ वर्षीय मुलीसह बुडून मृत्यू झाला.

या दोघांना वाचवण्यासाठी एक महिला आणि दोन तरुणींनी नदीत उडी मारली. मात्र पाण्याचा वेग जास्त असल्याने त्यांचा देखील बुडून मृत्यू झाला. या घनटेनंतर नदीच्या किनाऱ्यावर मोठी गर्दी झाली होती. सारण जिल्ह्यात आई आणि अन्य नातेवाईकांसह स्नान करण्यास गेलेल्या ५ मुलांचा बुडून मृत्यू झाला. मोतिहारी जिल्ह्यातील कल्याणपूर येथे आई आणि मुलीसह अन्य दोन मुलांचा बुडल्याने मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## कोणत्याही न्यायप्रक्रियेत कायदा पाळला गेला पाहिजे : फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बदलापूरमधील नामांकित शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी अक्षय शिंदे पोलीस एन्काऊंटरमध्ये मारला गेला. मुंब्रा बाह्यवळण मार्गाजवळ पोलीस वाहनातच झालेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाला. पण आता हे एन्काऊंटर ठरवून करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. अक्षय शिंदेच्या पालकांनीही तसाच दावा केला आहे. त्यासंदर्भात चर्चांना उधाण आलेलं असतानाच राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट भूमिका घेत पोलिसांच्या कृतीला पाठिंबा असल्याचं विधान केलं आहे. तसेच, तपासातून यातलं सत्य लोकांसमोर येईल, असंही ते म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांनी इंडिया टुडे कॉनक्लेव्हमध्ये सविस्तर मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्यांनी राज्यातील राजकीय घडामोडींसंदर्भात विचारण्यात आलेल्या प्रश्नांवर भाष्य केलं. त्याचवेळी बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरप्रकरणीही त्यांना प्रश्न विचारण्यात आले. त्यावेळी पोलिसांवर बंदूक रोखली तर पोलीस टाळ्या वाजवणार नाहीत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीसांनी यावेळी त्यांचा एन्काऊंटर पद्धतीवर विश्वास नसल्याचं स्पष्ट केलं. पहिली गोष्ट म्हणजे आमचा एन्काऊंटर पद्धतीवर विश्वास नाही. माझं म्हणणं आहे की कोणत्याही न्यायप्रक्रियेत कायदा पाळला गेला पाहिजे. कोणत्याही गुन्हेगाराला लवकरात लवकर शिक्षा व्हायला हवी, असं ते म्हणाले.

## छत्रपती शिवरायांचा पुतळा प्रकरणी चौकशी समितीचा अहवाल सादर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्लयावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा २६ ऑगस्ट रोजी कोसळला. या दुर्घटनेनंतर महाराष्ट्रातील राजकारण तापले होते. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाशिक येथे सदर घटनेबद्दल माफी मागितली. राज्य सरकाने या घटनेची चौकशी करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमली होती. या समितीने आपला १६ पानांचा अहवाल राज्य सरकारकडे सादर केला आहे. यात पुतळा कोसळण्याच्या विविध धक्कादायक कारणांची माहिती देण्यात आली आहे. हिंदुस्तान टाइम्सने सदर वृत्त दिले आहे.

पुतळा कोसळल्यानंतर याची चौकशी करण्यासाठी भारतीय नौदलात काम करण्याचा वीस वर्षांहून अधिक अनुभव असलेले पवन धिंग्रा यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. यात सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (इमारत) संजय दशपुते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी मुख्य अभियंता विकास रामगुडे, आयआयटी मुंबईच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे प्रा. आर.एस. जांगिड आणि धातू विज्ञान विभागाचे प्रा. परिदा यांचा समावेश होता. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्य सरकार दोषींवर कारवाई करेल, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. ३३ फुटांच्या पुतळ्याचा भार पेलू शकेल इतकी पुतळ्याची बांधणी मजबूत नव्हती. तसेच चुकीच्या पद्धतीने केलेले वेल्डिंग आणि गंज लागल्यामुळे पुतळा कोसळला असा प्राथमिक निष्कर्ष चौकशी समितीच्या वतीने काढण्यात आला आहे. तसेच पुतळा उभारल्यानंतर त्याची योग्य पद्धतीने देखभाल केली नाही, असाही ठपका ठेवण्यात आला आहे. देखभाल आणि दुरुस्ती न झाल्यामुळे पुतळा कोसळला, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नौदल दिनाच्या निमित्ताने ४ डिसेंबर रोजी या पुतळ्याचे अनावरण केले होते. मात्र २६ ऑगस्ट रोजी पुतळा कोळण्याची दुर्दैवी घटना घडली.

## विठ्ठल रुक्मिणीमातेच्या पूजेची १ ऑक्टोबरपासून होणार ऑनलाईन नोंदणी : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा, तुळशी पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. या पूजा नोंदणी करण्यासाठी मंदिर समितीने संगणक प्रणाली विकसित केली असून, दि. १ ऑक्टोबर पासून ऑनलाईन पद्धतीने पूजेची नोंदणी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

**पूजा नोंदणीसाठी संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम पूर्ण**

याबाबत मंदिर समितीच्या दि. २० ऑगस्ट रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम पूर्ण झाले असून, भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे.

दि. ७ ऑक्टोबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६ -२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा असे आवाहनही कार्यकारी अधिकारी श्री. शेळके यांनी केले आहे

## बापू हराळे यांनी एस टी च्या रक्कमेचा अपहार केल्यामुळे निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतीनीधी : राज्य परिवहन महामंडळाच्या अक्कलकोट आगारात वाहक या पदावर कार्यरत असलेले आणि सेवा शक्ती संघर्ष या संघटनेचे नेते असलेले संजय ऊर्फ बापू महादेव हराळे वाहक क्रमांक क्रमांक ९३२११ हे एस टी महामंडळाच्या ८२० रुपयांच्या रक्कमेचा अपहार केला आहे म्हणून बापू ऊर्फ संजय हराळे यांना एस टी प्रशासनाने निलंबित केले आहे.

या बाबत ची माहिती अशी की , संजय ऊर्फ बापू हराळे हे अक्कलकोट आगारात ८ जुलै २४ रोजी आरक्षण विभागात शालेय विद्यार्थी पासेस देण्यासाठी कर्तव्यास होते, सदर दिवशी पासेस आरक्षण मधुन उत्पन्न ४०४५० रुपये इतके मिळाले होतें, परंतु बापू ऊर्फ संजय हराळे यांनी एस टी च्या कॅशीअर कडे सदर ची पुर्ण रक्कम जमा न करता ३९६३०इतकी रक्कम जमा केले आहेत, त्यामुळे रा प महामंडळाचे ८२० रुपयाचे आर्थिक नुकसान झाले आहे, भरणा केलेल्या रक्कमेत ८२० रूपये कमी भरून बापू ऊर्फ संजय हराळे यानी अपहार केला आहे. त्यामुळे संजय ऊर्फ बापू हराळे यांना एस टी प्रशासनाने दिनांक १४ सप्टेंबर २४ पासून तडकाफडकी पुढील आदेशा पर्यंत निलंबित केले आहे. आणि अपहार केलेल्या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. निलंबीत कालावधीत संजय ऊर्फ बापू हराळे यांना हेड क्वार्टर न सोडण्याचे आणि वरिष्ठ अधिकारी यांच्या परवानगी शिवायकामाचे मुख्यालय न सोडण्याचे आणि दररोज आगारात दिवसातून दोन वेळा हजेरी देण्याचे आदेश पारित केले आहेत, एस टी प्रशासनाने निलंबित करण्याच्या केलेल्या कारवाई मुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली असुन अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

**ही कारवाई आमच्या संघटनेने आगार व्यवस्थापक यांनी राष्ट्रध्वजाचा अवमान केला व जातिवाद करून स्वतःच्या जातीच्या कर्मचाऱ्यांना सांभाळून घेतले आहे व इतर कर्मचाऱ्यांच्या आई वडील मयत झालेल्या रजा ही ना मंजूर केल्याच्या तक्रारी केल्याने ही कारवाई करण्यात आली असून यापूर्वी अक्कलकोट आगारांसह महाराष्ट्रातील सर्वच आगारात गर्दीच्या वेळी पैसे देवाण-घेवाण मध्ये पैसे कमी पडत असतात व ते नंतर भरून घेतले जातात परंतु अशी निलंबनाची कारवाई केली जात नाही.**

**- बापू हराळे**

**जम्मु काश्मिरमध्ये रिपब्लिकन पक्षाचे निवडुन येणारे आमदार हे भाजपलाच पाठिंबा देणार — केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले**

# जम्मु काश्मिर मध्ये दहशतवादाचा खात्मा करणारे भाजपचेच सरकार बहुमताने निवडुन येईल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने जम्मु काश्मिरमधील कलम ३७० हटवुन येथे मोठी क्रांती केली आहे. कलम ३७० हटल्यामुळे जम्मु काश्मिरमध्ये विकास होत आहे. उद्योग वाढलेला आहे. त्यामुळे रोजगारही वाढत आहे. मोंदीच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने येथील दहशतवादाचा खात्मा करून लोकशाहीचे नंदनवन जम्मु काश्मिरमध्ये फुलविले आहे. यामुळे जम्मु काश्मिरमधील जनता निवडणुकीमध्ये उत्साहाने भाग घेवुन मतदान करीत आहे. दहशतवादाच्या भीतीवर येथील जनतेने मात केली असून जनता मोठया प्रमाणात लोकशाहीच्या उत्सव असणा-या निवडणुकामध्ये मतदान करीत आहेत. त्यामुळे दहशतवादावर




मात करुन लोकशाही मजबुत करणाऱ्या भाजपलाच जम्मु काश्मिरमधील जनता विधानसभा निवडणुकीत बहुमताने विजयी करेल. जम्मु काश्मिरमध्ये भाजपचेच सरकार बहुमताने येईल असा विश्वास रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज व्यक्त केला.

जम्मु काश्मिरमध्ये रिपब्लिकन पक्षाचे ४ उमेदवार विधानसभा निवडणुक लढत आहेत. आज जम्मु काश्मिरमधील रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी आयोजित प्रचारसाठी ना. रामदास आठवले जम्मु काश्मिरचा दोन दिवसीय दौऱ्यांवर आले आहेत.

या विधानसभा निवडणुकीत जम्मु काश्मिरच्या विधानसभेत रिपब्लिकन पक्ष आपले खाते उघडणार आहे. रिपब्लिकन पक्ष नोंदणीकृत पक्ष असल्याने काही जागांवर निवडणुक लढणे आवश्यक असल्याने जम्मु काश्मिरमध्ये रिपब्लिकन पक्ष ४ जागांवर ताकदीने निवडणुक लढत आहे. उर्वरित जागांवर रिपब्लिकन पक्षाचा भाजपला जाहीर पाठिंबा आहे. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार विजयी झाल्यास रिपब्लिकन पक्षाचे विजयी उमेदवार हे भाजपलाच सरकार स्थापनेसाठी पाठिंबा देतील अशी ग्वाही ना. रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केली.

जम्मु काश्मिरमध्ये कलम ३७० हटल्यामुळे या भागात गुंतवणुक वाढुन रोजगार वाढत आहे. उद्योगधंदे वाढत आहेत. शांतता नांदत आहे. यापूर्वी जम्मु काश्मिरमध्ये दहशतवाद, आतंकवादाने थैमान घातले होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोंदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने जम्मु काश्मिरमध्ये दहशतवादाचा खात्मा करण्याचे काम केले आहे. अजुनही जम्मु काश्मिरमधील दहशतवाद संपवण्यासाठी केंद्र सरकार काम करीत आहे. जम्मु काश्मिर हा भारताचा अविभाज्य घटक आहे. जम्मु काश्मिरला भारतात अन्य राज्यांशी जोडण्याचा ; भारताचा अविभाज्य घटक करण्याचा प्रयत्न येथील पी डी पी ; नॅशनल कॉन्फरन्स आणि काँगेस पक्षांनी फारसे प्रयत्न केलेले नाहीत. मात्र कलम ३७० हटवुन जम्मु काश्मिर हा भारताचा अविभाज्य घटक झाला असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सिध्द केले आहे. असे ना.रामदास आठवले म्हणाले.

जम्मु काश्मिरमध्ये आता भारतातील अन्य राज्यातील उद्योजक जम्मु काश्मिरमध्ये उद्योग, व्यवसाय आणि नोकरीही करु शकतात. जम्मू काश्मीर मध्ये रेल्वे रस्ते पूल उभारून विकासाच्या वाटांचा नवा मार्ग प्रशस्त केला जात आहे.यामुळे जम्मु काश्मिर हे भारताला ख-या अर्थाने जोडले गेले आहे. जम्मु काश्मिरमधील जनतेच्या मनातुन दहशतवादाची भिती दुर करण्यात केंद्र सरकारला (पान २ वर...)

**केंद्र सरकारने देशभरातील ८० कोटी गरिबांना मोफत अन्न धान्य देण्याची योजना सुरु केली असुन त्याचा मोठया प्रमाणात जम्मु काश्मिरमधील गरीब जनतेला लाभ होत आहे. केन्द्र सरकार च्या प्रधानमंत्री आवास योजना, उज्वला योजना, आयुष्यमान भारत योजा. आदि अनेक योजनांचा जम्मु काश्मिरमधील जनतेला लाभ मिळालेला आहे. त्यामुळे निश्चितच भाजपला जम्मु काश्मिर विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळेल असा विश्वास ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केला. रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांच्या आयोजित जाहीर सभांना जनतेचा मोठा प्रतिसाद लाभत आहे.**

## संपादकीय....

### अहवाल सादर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्यावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा २६ ऑगस्ट रोजी कोसळला. या दुर्घटनेनंतर महाराष्ट्रातील राजकारण तापले होते. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाशिक येथे सदर घटनेबद्दल माफी मागितली. राज्य सरकाने या घटनेची चौकशी करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमली होती. या समितीने आपला १६ पानांचा अहवाल राज्य सरकारकडे सादर केला आहे. यात पुतळा कोसळण्याच्या विविध धक्कादायक कारणांची माहिती देण्यात आली आहे. पुतळा कोसळल्यानंतर याची चौकशी करण्यासाठी भारतीय नौदलात काम करण्याचा वीस वर्षांहून अधिक अनुभव असलेले पवन धिंग्रा यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. यात सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (इमारत) संजय दशपुते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी मुख्य अभियंता विकास रामगुडे, आयआयटी मुंबईच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे प्रा. आर.एस. जांगिड आणि धातू विज्ञान विभागाचे प्रा. परिदा यांचा समावेश होता. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्य सरकार दोषींवर कारवाई करेल, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. ३३ फुटांच्या पुतळ्याचा भार पेलू शकेल इतकी पुतळ्याची बांधणी मजबूत नव्हती. तसेच चुकीच्या पद्धतीने केलेले वेल्डिंग आणि गंज लागल्यामुळे पुतळा कोसळला असा प्राथमिक निष्कर्ष चौकशी समितीच्या वतीने काढण्यात आला आहे. तसेच पुतळा उभारल्यानंतर त्याची योग्य पद्धतीने देखभाल केली नाही, असाही ठपका ठेवण्यात आला आहे. देखभाल आणि दुरुस्ती न झाल्यामुळे पुतळा कोसळला, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नौदल दिनाच्या निमित्ताने ४ डिसेंबर रोजी या पुतळ्याचे अनावरण केले होते. मात्र २६ ऑगस्ट रोजी पुतळा कोळण्याची दुर्दैवी घटना घडली. यानंतर पुतळा घडविणारा शिल्पकार जयदीप आपटे आणि सदर काम देण्यात आलेला कंत्राटदार चेतन पाटील यांना अटक झालेली आहे. जयदीप आपटेने २८ फुटांच्या प्रत्यक्ष पुतळ्याचे काम केले होते. तर चेतन पाटीलने चौथरा आणि आजूबाजूच्या भागाचे सुशोभिकरणाचे काम केले होते. पुतळा कोसळल्यानंतर राज्य सरकारकडून दोन समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. वर नमूद केलेली तांत्रिक समिती होती. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा त्यांच्या कर्तुत्वाला साजेसा असा भव्य आणि अत्युत्कृष्ट दर्जाचा पुतळा उभारण्यासाठी वेगळी समिती स्थापन करण्यात आली होती. देशातील उत्तम शिल्पकार, स्थापत्य अभियंते, तज्ज्ञ, नौदलाचे अधिकारी यांची एक वेगळी समिती अतिरिक्त मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मनीषा म्हैसकर यांच्या नेतृत्वाखाली काम करणार आहे.

# विरंगुळा म्हणून पर्यटनाला महत्व द्यावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पहिला जागतिक पर्यटन दिन २७ सप्टेंबर १९८० रोजी आंतरराष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा करण्यात आला. तेव्हा पासून दरवर्षी जगभरात विविध भागांमध्ये पर्यटनाला चालना देण्यासाठी २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन म्हणून याच दिवशी साजरा करण्यास सुरुवात झाली. कारण संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्थेची स्थापना १९७० मध्ये याच दिवशी झाली होती. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक पर्यटन संघटनेने जबाबदार, शाश्वत आणि सार्वत्रिक पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक पर्यटन दिन घोषित केला आहे. याचा फायदा पर्यटकांना आणि त्यांनी भेट दिलेल्या ठिकाणांना होतो, तसेच देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते.

मनोरंजन, फुरसत किंवा कामासाठी केलेला प्रवास म्हणजेच पर्यटन. जागतिक पर्यटन संस्था ही 'जे लोक प्रवास करून आपल्या परिसराबाहेरील जागी जाऊन सलग १ वर्षापेक्षा कमी काळ मनोरंजन, काम व इतर कारणांसाठी राहतात ते' अशी पर्यटकांची व्याख्या करते. पर्यटन हे फुरसतीचा वेळ घालविण्याचे एक साधन म्हणून जगभरात अतिशय लोकप्रिय झाले आहे. पर्यटन ही संज्ञा प्रवास या शब्दाशी संबंधित आहे आणि प्रवास हा शब्द लॅटिन भाषेतील 'टोर्नोस' या शब्दापासून आलेला आहे. या शब्दाचा मूळ अर्थ 'वर्तुळ' किंवा 'वर्तुळाकार' असा आहे. याच शब्दापासून पुढे 'वर्तुळाकार प्रवास' किंवा पॅकेज टूर्स हा शब्द रुढ झाला. एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय. ज्यांना मुक्त भटकायची, मनमुराद फिरायची आवड आहे अशांना पर्यटन क्षेत्रात कारकीर्द करणे सहज शक्य झाले आहे. आवडच कारकीर्द झाल्यास मिळणारा आनंद मोठा असतो. दळवळणाच्या सुविधा वाढल्याने मुक्तसंचार करणे आता सोपे झाले आहे. देशाच्या कुठल्याही प्रदेशात किंवा परदेश गमन करण्याकडे अलीकडे लोकांचा कल वाढू लागला आहे. वर्षभरात पर्यटन या क्षेत्रात २५ टक्क्याने वाढ होते.

जागतिक पर्यटन दिन साजरा करण्याचे प्राथमिक उद्दिष्ट जगभरातील पर्यटनाचे महत्त्व वाढविणे आणि सामान्य जनतेला हे दर्शविणे आहे की, पर्यटन केवळ देशाच्या आर्थिक मूल्यांवरच नाही तर सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक मूल्यांवर देखील परिणाम करते. इस्तंबूल, तुर्की येथे १९९७ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक व्यापार संघटनेच्या सर्वसाधारण सभेने जागतिक पर्यटन दिनादरम्यान सहभागी म्हणून काम करण्यासाठी प्रत्येक वर्षी यजमान देशाचे नामांकन करण्याचा निर्णय घेतला. अनेक देशांची पर्यटन मंडळे जागतिक पर्यटन दिनाच्या उत्सवात सामील आहेत, जे त्यांच्या शहरांमध्ये, राज्यांमध्ये किंवा देशांमध्ये पर्यटनाला चालना देण्यासाठी आकर्षक ऑफर लाँच करतात. गेल्या काही वर्षांत कोरोना महामारीमुळे पर्यटनाला आव्हाने होती. मात्र गेल्या वर्षभरात त्यात आश्चर्यकारक वाढ झाली आहे.

पर्यटन व्यवस्थापन आणि नियोजन या अभ्यास शाखाही आता महाविद्यालयीन शिक्षणात आल्या आहेत. अनेक परदेशी पर्यटन कंपन्या या क्षेत्रात गुंतवणूक करत आहेत. देशातही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो आहे. सार्वजनिक आणि खाजगी स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने पर्यटन हे क्षेत्र उपयुक्त आहे. ट्रॅव्हल आणि टुरिझम या विषयात पदवीसाठी बारावी पास आणि पदव्युत्तर पदवीसाठी कोणत्याही विषयातील पदवी आवश्यक आहे. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी फिरण्याची आवड असायला हवी तसेच संवाद कौशल्य उत्तम असणे आणि दोनपेक्षा अधिक भाषेवर प्रभुत्व असायला हवे. काही परदेशी भाषा आत्मसात असल्यास खूप फायद्याचे ठरते. भौगोलिक प्रदेशांची उत्तम जाण असायला हवी. सहकार्यवृत्ती आणि प्रतिकूल परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य असेल तर लोकांमध्ये पटकन एकरूप होणे सोपे होते. सामाजिक निती नियमांचा आणि परंपरांचा आदर करणेही गरजेचे असते. त्याचबरोबर त्या देशाचा इतिहास, कला आदीची प्राथमिक माहिती हवी. निवास, वाहतूक, अन्न, समारंभ, साहसी पर्यटन आदी सेवा देणारे हे क्षेत्र आहे. आपल्या आवडीनिवडीनुसार यातील अनेक विभागात काम करता येते.



स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून पर्यटन विभागात नोकरीच्या संधी मिळतात. पर्यटन संचालनालयाच्या माध्यमातूनही अनेक पदे भरली जातात. सरकारी नोकरीत येण्यासाठी मात्र या विषयातील पदवीप्राप्त असणे गरजेचे आहे. तसेच अनेक परदेशी कंपन्यात संधीही आहेत. अनेक विमानसेवा प्रदान करणाऱ्या कंपन्यांना या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. खाजगी समूहात व्यवस्थापन आणि आदी बाबींसाठी उत्तम वेतनही मिळते. या विभागात आरक्षण, विपणन, विक्री, नियोजन, मार्गदर्शन यासाठी अनेक जागा भरल्या जातात. हा उपलब्ध पर्यटनसंबंधी जागा आणि तिथे मिळणाऱ्या सेवांची तपशीलवार माहिती देण्याचे काम करतो. त्याच्या सहकार्यामुळे प्रवाशांना योग्य नियोजन करण्यास मदत होते. पर्यटन मंत्रालय गाईडला (मार्गदर्शक) मान्यता देते. प्रादेशिक, राज्य आणि स्थानिक असे तीन प्रकार त्यात पडतात. हा परवान्याचे दर दोन वर्षांनी नूतनीकरण करता येते. स्थळांची सविस्तर आणि इत्यंभूत माहिती देणे आणि सांस्कृतिक परंपरा आदीची माहिती देण्याचे काम गाईड करत असतो. त्याच्याकडे उत्तम संवाद कौशल्य असायला हवे कारण तो प्रत्यक्ष स्थळांवर जाऊन मार्गदर्शन करत असतो. एकंदरीत गाईड हा महत्त्वाचा दुवा असतो. टूर ऑपरेटर्स हे प्रवासाचे संपूर्ण नियोजन करतात. टूर गाईड म्हणून अनुभव आल्यानंतर या पदावर काम करता येते.

ट्रॅव्हल एजन्सी यांचे अनेक लोक ग्राहकांना एजन्सीशी जोडतात. आता ऑनलाइनही ग्राहक जोडता येतात. ग्राहकांशी संवाद साधून अनेक प्लॅन ते देत असतात आणि ग्राहकांना कंपनीशी संपर्क करून देतात. पर्यटन आणि हॉटेल क्षेत्र या दोन्हींचा संबंध अनन्यसाधारण आहे. प्रवासात मुक्कामाची सोय करण्याचे काम एकमेकांच्या सहाय्याने केले जाते. यावर आकर्षक सवलती देऊन ग्राहक मिळवण्याकडे कल असतो. जवळजवळ एक लाख कुशल मनुष्यबळाची गरज या व्यवसायाला सध्या आहे. तसेच, विमान कंपन्यासाठी काम करणे ही वेगळा आनंद देणारी संधी असते. इतर व्यवस्थापन अभ्यासक्रम पूर्ण असल्यास प्राधान्याने संधी मिळते. त्याचबरोबर आकर्षक वेतनही दिले जाते.

२०१८ ला 'पर्यटन आणि डिजिटल परिवर्तन' हे मुख्य उद्दिष्ट ठेवून पर्यटन दिन साजरा केला गेला. पूर्ण वर्षभर जगभरातील सर्व देशांनी त्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम, योजना, सुविधा यांचे नियोजन केले. या वर्षभरासाठी पर्यटनदिनासाठीचा विषय म्हणजे पर्यटन आणि नोकऱ्या सर्वांसाठी चांगले भविष्य हा होता. भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे भारताने प्रथमच जागतिक पर्यटन दिन-२०१९ उत्सवाचे आयोजन दिल्लीमध्ये केले. भारत त्याच्या विविधतेसाठी प्रसिद्ध आहे आणि पर्यटकांना विविध पाककृती, साहसी ठिकाणे, संगीत, इतिहास, भाषा इत्यादी देण्याची क्षमता आहे. जागतिक पर्यटन संस्थेने पर्यटन आणि तंत्रज्ञानाचे महत्त्व, पर्यटनासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि त्याशी संबंधित नोकऱ्या निर्माण करण्यावर भर दिला आहे.

पर्यटन मंत्रालयाने पर्यटनाच्या विकासासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय धोरणांची आखणी केली आहे. या प्रक्रियेत मंत्रालय विविध केंद्रीय मंत्रालये, संस्था, राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेश आणि खाजगी क्षेत्रातील प्रतिनिधींसह या क्षेत्रातील अन्य भागधारकांशी सल्लामसलत व सहयोग करतात. ग्रामीण, समुद्रपर्यटन, वैद्यकीय आणि इको टूरिझम यासारख्या पर्यटन उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी संबंधित प्रयत्न केले जात आहेत. पर्यटन मंत्रालयाने भारताच्या पर्यटनाला चालना देण्यावर भर देऊन अतुल्य भारत मोहीम कायम ठेवली आहे. दरवर्षी जागतिक पर्यटन दिनाची थीम पर्यटन पुनर्विचार ही आहे. महामारीनंतर आलेल्या बदलांचा सर्वाधिक परिणाम पर्यटनावर झाला. अशा स्थितीत पर्यटनात सहज शक्य तितके नवीन बदल करून या उद्योगाला पुन्हा चालना मिळू शकेल अशा गोष्टींकडे यंदा लक्ष दिले जाणार आहे. सर्वांना आज जागतिक पर्यटन दिनाच्या शुभेच्छा !

**प्रविण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : pravinbagde@gmail.com

# भक्त रक्षणासाठी भगवंत अनेक अवतार घेतो : ह.भ.प.मंजुश्री थोरात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : ज्या ज्या वेळी धर्मावर संकट येते त्या त्या वेळी भगवान परमात्मा दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांचा नाश करण्यासाठी ,भक्तांच्या रक्षणासाठी व धर्माचे रक्षणासाठी या भुतालावर अवतार घेतात, या कलियुगात उध्दरुन जाण्याचा एकच मार्ग म्हणजे नाम साधना असून नाम चिंतनाने भक्तावर आलेली संकटे दूर होतात म्हणून नित्यनियमाने नामचिंतन करा असा उपदेश ह भ प भागवताचार्य मंजुश्री ताई थोरात यांनी उपस्थितांना दिला.

कै. सौ. सुमनबाई रामकृष्ण निर्मळ यांचे प्रथम पुण्यस्मरण निमित्ताने



ह भ प भागवताचार्य मंजुश्रीताई थोरात यांचे संगीतमय श्रीमद् भागवत कथेचे आयोजन खंबाळा तालुका वैजापूर निर्मळ वस्ती येथे करण्यात आले होते, कथेच्या चौथ्या दिवसा प्रसंगी त्या बोलत होत्या, श्रीमद् भागवत कथा श्रवण केल्याने जीवाला अनेक फायदे होतात या दुःख रूप संसारात जीव संपूर्ण आयुष्य सुखाच्या शोधात खर्च करतो परंतु त्याला सुख मिळत नाही, अनमोल अशा नरदेहात जीवाने नामचिंतन करावं कारण हा जन्म परत परत मिळणार नाही, मिळाला तो समजून घ्या व अनमोल अशा नरदेहाचे सार्थक करा असा अनमोल संदेश ह भ प भागवताचार्य मंजुश्रीताई थोरात यांनी अनेक उदाहरणांचे दाखले देऊन केला.

या कथेला साथ संगत ह भ प युवा कीर्तनकार गीता दीदी कदम, ह भ प ज्ञानेश्वरी थोरात, ह भ प राजेंद्र महाराज थोरात ,दत्तात्रय महाराज साळवे ,तुपे महाराज यांनी दिली असून कथेतील विविध पात्र कु.देवयानी निर्मळ,कु. समृद्धी निर्माण कू.कृष्णा निर्मळ, परिक्षिती निर्मळ, राजेंद्र जाधव ,यांनी साकारली असून कथेच्या शेवटी भाविकांना दररोज महाप्रसादाचे वाटप करण्यात येत होते समस्त निर्मळ परिवाराचे व भजनी मंडळाचे,ग्रामस्थाचे ,या कथेला अनमोलअसे सहकार्य लाभले आहे.

# जम्मु काश्मिर मध्ये दहशतवादाचा खात्मा करणारे भाजपचेच सरकार बहुमताने निवडुन येईल

(पान १ वरून..) यश येत आहे. जम्मु काश्मिरच्या विकासासाठी भाजपच्याच हाती सत्ता देणे योग्य असणार आहे अशी जम्मु काश्मिरमधील जनतेला खात्री पटली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत जम्मु काश्मिरमध्ये भाजपला बहुमत मिळणार असून भाजपचेच सरकार येईल. रिपब्लिकन पक्षाचेही निवडुन येणारे आमदार हे भाजपलाच पाठिंबा देतील असे ना. रमादास आठवले म्हणाले. जम्मु काश्मिरच्या पहिल्या टप्प्यात मतदानात एकुण ५९ टक्के मतदान झाले आणि दुसऱ्या टप्प्यात ५८ टक्के मतदान झाले. आणि १ तारखेलाही ३ टप्प्यातील मतदान हे मोठया प्रमाणात होईल. अन्य राज्यापेक्षा जम्मु काश्मिरमध्ये मोठया प्रमाणात मतदान झाले आहे. हे येथील लोकशाही मजबुत होत असल्याची ग्वाही आहे असे ना. रामदास आठवले यावेळी म्हणाले. बारामुल्ला जिल्हयातील गुलमर्ग येथे गुलमर्ग विधासभा मतदार संघात रिपब्लिकन पक्षाचे अधिकृत उमेदवार अब्दुल अहाद आखून यांच्या जाहीर प्रचार सभेत ना. रामदास आठवले यांचे प्रमुख भाषण झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जम्मु काश्मिरच्या रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षा संध्या गुप्ता आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. रिपब्लिकन पक्षाचे ४ उमेदवार जम्मु काश्मिर विधानसभा निवडणुकीत निवडणुक लढत आहेत. त्याचे पहिल्या टप्प्यातील पुलवामा जिल्हयातील राजपोरा विधानसभा मतदार संघात डेसी रैना या रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवार असून यांच्या नावाची विधानसभा निवडणुकीत मोठया प्रमाणात चर्चा झाली. त्या निश्चित निवडुन येतील असा विश्वास ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केला. त्यानंतर बारामुल्ला जिल्हयातील गुलमर्ग विधानसभा मतदार संघात अब्दुल अहाद आखून, बंदीपुरा जिल्हयात सोनावारी विधानसभा मतदार संघात मोहम्मद अब्दुल्ला खान आणि बारामुल्ला जिल्हयात बारामुल्ला विधानसभा मतदार संघात आदिल इस्लाम हे रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार जम्मु काश्मिर विधानसभा निवडणुकीमध्ये निवडणुक लढत आहे. यांच्या प्रचारासाठी ना. रामदास आठवले दोन दिवसीय जम्मु काश्मिर दौऱ्यांवर आलेले आहेत.

# विशेष गौरव पुरस्कार; माजी सैनिक, पत्नी व पाल्यांनी २७ सप्टेंबरपर्यंत अर्ज करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : विविध क्षेत्रात अति उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व देशाची प्रतिष्ठा वाढविणाऱ्या जिल्ह्यातील माजी सैनिक, पत्नी व पाल्यांना विशेष गौरव पुरस्कारांचे निवड करण्याकरीता दि. २७ सप्टेंबरपर्यंत जिल्हा सैनिक कार्यालय, सोलापूर येथे अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

विशेष गौरव पुरस्कार म्हणून एकरकमी १० हजार व २५ हजार रुपये प्रदान केले जाणार आहेत. या पुरस्काराकरिता राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळातील पुरस्कार प्राप्त खेळाडू, साहित्य, संगीत, गायन, वादन, नृत्य, नाट्य व इतर क्षेत्रातील अतिउत्कृष्ट कामगिरी पुरस्कार विजेते, यशस्वी उद्योजकांचा पुरस्कार मिळविणारे, संगणक क्षेत्रात अतिउत्कृष्ट कामगिरी करणारे, पूर,जळीत, दरोड, अपघात अगर इतर नैसर्गिक आपत्तीमध्ये बहुमोल कामगिरी करणारे तसेच देश, राज्याची प्रतिष्ठ वाढवतील अशा स्वरूपाचे लक्षणीय काम करणारे माजी सैनिक, पत्नी, पाल्य इत्यादी यांना तसेच सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी १२ वी मध्ये ९० टक्के पेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या पदवी किंवा पदव्युत्तर परिक्षेत विद्यापीठात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या व आय.आय.टी, आय.आय.एम, ए.आय.आय.एम.एस अशा नामवंत व ख्यातीप्राप्त संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या माजी सैनिक, विधवांच्या पाल्यांनी विशेष गौरव पुरस्कारासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचेकडे कागदपत्रासह दिनांक २७ सप्टेंबर २०२४ पुर्वी अर्ज करावेत. विशेष गौरव पुरस्कारासाठी आवश्यक असणारा विहीत नमुन्यात फॉर्म जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे उपलब्ध आहेत तरी संबंधितांनी कार्यालयाशी विनाविलंब संपर्क साधावा.

वैयक्तीक अर्ज, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात उपलब्ध (डी.डी ४०) विहित नमुना फॉर्म, पाल्य शिकत असलेबाबतचा बोनाफाईड दाखला, मार्कशिटची सांक्षांकित प्रत, माजी सैनिक, विधवेचे ओळखपत्राची छायांकित प्रत, डिसचार्ज बुक मधील फॅमिली डिटेलच्या पानाची झेरॉक्स प्रत, बँक पासबुकची पहिल्या पानाची छायांकित प्रत, आधार कार्ड छायांकित प्रत, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केले असेल तर त्याबाबतचे प्रमाणपत्र, वर्तमानपत्रात प्रसिध्दी, फोटो इत्यादी बाबतची कागदपत्रे सादर करावीत.

मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही .अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे दुरध्वनी क्रमांक ०२१७-२९९२३६६ संपर्क साधावा असेही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सोलापूर यांनी कळविले आहे.

# निष्फळ ठरलेल्या शासनाच्या विरोधात युवा भिम सेनेचा जन आक्रोश महाएल्गार मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा/अमर जाधव : औसा शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकर्ती पुतळ्याच्या मागणीसाठी व इतर अन्य मागण्यासाठी युवा भीमसेना आंबेडकर संघटनेच्या वतीने आज औसा शहरात



जनाक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते महाराष्ट्रातील वाढत्या दलित अत्याचार विरोधातील घटना तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर सध्याचे चालू सरकार निष्फळ ठरले आहे या विषयाला धरून आज औसा शहरात संपूर्ण औसा तालुक्यातील आंबेडकरी कार्यकर्त्यांनी जन आक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते

युवा भीमसेनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज काटे यांच्या नेतृत्वात औसा मोड ते तहसील कार्यालय पर्यंत येत असताना युवा भीम सेनेच्या विविध प्रकारच्या घोषणा दिल्या या सरकारचं करायचं काय खाली मुंडी वरी पाय पंकज भाऊ तुम्ह आगे बडो हम तुम्हारे साथ है विविध घोषणा देण्यात येत होत्या युवा भीमसेनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज काटे बोलताना म्हणाले की आम्हाला आमदार किच्या तिकिटाला नसून भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे आमचं अस्मिता आहे व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकर्ती पुतळा शहरांमध्ये उभारण्यात यावा यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले औसा तालुक्यातील खेडेपाडा सह आंबेडकरी समाज या मोर्चामध्ये सहभागी झाला होता औसा मोडते तहसील कार्यालयापर्यंत विविध घोषणा देण्यात आल्या नंतर औसा तहसीलचे तहसीलदार अडसुळे यांना युवा भीमसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले आमच्या भावना शासन दरबारी पोहोचवावे व आमचा मागण्यांचा विचार करावा अन्यथा याही पेक्षा उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशाराही आंबेडकरी समाजाने दिला.



# वागदरी ग्रामपंचायत सरपंच पदी शिवानंद घोळसगाव यांची निवड झाल्याबद्दल विविध मान्यवरांच्या हस्ते सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : वागदरी ग्रामपंचायतीचे नुतन सरपंच पदी शिवानंद घोळसगाव यांची निवड झाल्याबद्दल विविध मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद वागदरी गटांचे माजी सदस्य श्री आनंद तानवडे यांच्या कडून मानाचा कोल्हापूरी फेटा बांधून शाल हार फुलगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले त्याचवेळी गोगाव ग्रामस्थ कडुन टोपी शाल हार पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले यावेळी गोगावचे माजी सरपंच श्री प्रदीप जगताप , उपसरपंच श्री कमलाकर सोनकांबळे, श्री कलप्पा बिराजदार यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.

यावेळी बोलताना सरपंच घोळसगाव म्हणाले की, गावाच्या विकासासाठी मी कायम प्रयत्नशील राहीन कुठल्याही प्रकारचे राजकारण न करता सर्व सदस्य यांना विश्वासात घेऊन गावाचे कायपालट करण्यासाठी प्रयत्न करणार आहे यावेळी मान्यवरानी शुभेच्या मनोगत व्यक्त केले. त्याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य श्री श्रीशैल ठोंबरे श्री शिवराज पोमाजी मंत्री, श्री श्रीकांत इंडे, श्री विकास नजुडे ,श्री सलीम बागवान , श्री शाम बाबर श्री राम पोमाजी, श्री गुरूनाथ आळंद श्री पराप्पा सुतार श्री शिवानंद हुलगेरी श्री शिवशरणप्पा सुरवसे गोगाव व वागदरी येथील ग्रामस्थ उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## गुन्हेगारी जगत...

### अज्ञात चोरट्याने दुकानातून मोबाईल पळवला

सोलापूर (प्रतिनिधी) शेळगी,मित्र नगर येथील महागड्या किमतीचा मोबाईल हा दुकानातील काउंटरवर ठेवलेला असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १८ सप्टेंबर रोजी रात्री आठ ते नऊ वाजण्याच्या दरम्यान घडली या प्रकरणी रामचंद्र विठोबा कांबळे (वय-२२,रा.मित्र नगर,शेळगी) याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार आरे-नवरू हे करीत आहेत.

### मंडपाच्या साहित्याला आग लावून दीड लाखांचे नुकसान

सोलापूर (प्रतिनिधी) उत्तर सदर बझार येथील घराजवळ ठेवलेले मंडपाच्या व्यवसायाच्या साहित्याला आग लावून साहित्य नष्ट करून १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी बाळकृष्ण पांडुरंग सदाफुले (वय-४०-,रा.बॉम्बे पार्क,जुळे सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून राहुल बंडू गुजले,बंडू गुजले व विठ्ठल गुजले (सर्व. रा.उत्तर सदर बझार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना ६ ऑगस्ट रोजी उत्तर सदर बझार येथे घडली.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अहिवळे हे करीत आहेत.

### अपार्टमेंटच्या पार्किंग मधून दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) मेलेडी अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये पार्क केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ८ ते १८ सप्टेंबर दरम्यान मेलेडी अपार्टमेंट जुळे सोलापूर येथे घडली.याप्रकरणी वीणा ज्ञानेश्वर पवार (वय-४३,रा.मेलेडी अपार्टमेंट) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भिसे हे करीत आहेत.

# रस्ता सुसाट, पण ब्रेकर सतरा साठ

## गेल्या ६ महिन्या खालीच अक्कलकोट वागदरी रस्त्याची खड्डे बुजवा.. पैसे उपसा योजना राबविण्यात आली होती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट / प्रतिनिधी : तालुक्यातील अक्कलकोट वागदरी रस्त्यावर डांबर उखडून खड्डे पडल्याने वाहनचालकांना यांचा नाहक त्रास होत असून, विशेष धक्कादायक बाबा म्हणजे या रस्त्याला सतरा साठ ब्रेकर असून, आणि कित्येक धोकादायक वेडीवाकडी

### मलम न लावता पट्टी केल्याने अक्कलकोट वागदरी रस्ता पुन्हा खड्डेमय

वळणे आहेत. या वेडी वाकड्या वळचा अंदाज नवीन वाहन चालकांना येत नसल्याने आतापर्यंत कित्येकांना या अक्कलकोट वागदरी रोडवर जीव गमावावं लागला असून, या घटना वारंवार घडतात पण या गंभीर घटनेची कोणीच दाखल घेत नाही.

वेडी वाकडी वळणे व सतरा साठ ब्रेकराचा संध्याकाळी च्या वेळी व दिवसा देखील वाहन चालकाच्या निदर्शनास येत नाहीत पण गाडी जवळ जाताच हे ब्रेकर व वळणे दिसतात अचानक पणे गाडी कंट्रोल करणे हे वाहन चालकांना धोक्याचे ठरत असून, यापूर्वी कित्येकांचा बळी या रोडवर गेलाय पण राष्ट्रीय महामार्ग व स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी केवळ झोपेचे सोंग घेऊन नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा स्वरूप आपणास वारंवार पाहायला मिळत आहे.

आतापर्यत २० जण या रोडवर मृत्युंमुखी पडले असून, या मृत्यूला सर्वस्वी राष्ट्रीय महामार्ग विभाग जबाबदार असून, संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यावर गुन्हा करण्याची मागणी मराठा सेवा संघांचे जिल्हाकार्यकारणी सदस्य प्रवीण घाटगे

> अक्कलकोट वागदरी रस्ता हा गेल्या सहा महिन्याखालीच दुरुस्त करण्यासाठी खड्डे झाकून पैसे उपसा ही योजना राबविण्यात आली होती. पण सहा महिन्यात पुन्हा या रस्त्याची वाट लागली आहे. बोगस कामाची चौकशी होऊन हा रस्ता पुन्हा दुरुस्त करावा व वेडी वाकडे वळणे असल्याने वारंवार अपघात घडतात. याचा राष्ट्रीय महामार्ग विभागाने जर दाखल घेऊन या रस्त्याचा प्रश्न येत्या ८ दिवसात मार्गी न लावल्यास सांगवी बु येथे रस्ता रोको आंदोलन करणार आहे.
>
> **– प्रविण घाटगे** (मराठा सेवा संघ, जिल्हाकार्यकारणी सदस्य)



यांनी केली असून, हा अक्कलकोट वागदरी रस्ता तात्काळ दुरुस्त होऊन या रोडवरील बेकायदेशीर ब्रेकर काढून आवश्यक त्या ठिकाणी ब्रेकर करण्यात यावे व अक्कलकोट वागदरी हा रस्ता सा बा विभागाच्या आखतरीत होता पण गेल्या ५ ते ६ वर्षांपासून हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाच्याकडे हस्तातरीत करण्यात आला आहे. या विभागाच्या ठेकेदार व अधिकाऱ्यानी या गंभीर बाबीकडे डोळेझाक करीत असून, आणखीन किती बळी गेल्यावर हा रस्ता होणार आहे...? असा सवाल नागरिकांतुन विचारला जात आहे.

अक्कलकोट वागदरी राष्ट्रीय राज्य महामार्ग हा रस्ता कर्नाटक व मराठावाडा यांना जोडणारा अत्यंत महत्वाचा रस्ता समजला जातं असून या रस्त्यावर सर्वात जास्त रहदारी असते. या सांगवी बु पुलाजवळ पडलेल्या मोठ्या खड्ड्यात आत्तपर्यंत ३० ते ४० जण पडून गंभीर जखमी झाल्याची घटना घडली असून, त्यातच एका महिलेचे मृत्यू झाले आहे. अशा गंभीर घटना वेळोवेळी घडत असताना देखील राष्ट्रीय महामार्ग विभाग हे झोपेचे सोंग घेत आहे. जर येत्या आठवड्याभरात हा अक्कलकोट वागदरी राष्ट्रीय महामार्गची दुरुस्ती न केल्यास सांगवी बु सह पंचक्रोशीतील नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन करण्याची चर्चा खेडपाड्यात रंगली आहे.



# पंढरपूर मध्ये बांधकाम कामगारांना १००० गृह उपयोगी वस्तू भांडे संचांचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : बांधकाम मंडळाकडून सक्रिय जीवित नोंद असणाऱ्या कामगारांना घडवून साहित्य संस्थेचे वाटप सत्यशोधक कामगार संघटनेच्या माध्यमातून पंढरपुरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नगर येथे करण्यात आले.



त्यावेळेस संचाचे वाटप माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी परिचारकांनी संबोधित करताना कामगारांना सर्वतोपुरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

कामगारांच्या घरकुलाचा प्रश्न प्राधान्याने सोडवून पंढरपूर नगर परिषदेच्या माध्यमातून पंतप्रधान आवास योजनेची घरे कामगारांना देण्यासाठी प्रयत्नशील राहणार. गारांना शैक्षणिक साहित्य आर्थिक, आरोग्य, सामाजिक योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार व सामाजिक कार्य करताना उपेक्षित, वंचितांसाठी काम करणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले यावेळेस रवी सर्व गोड, प्रदीप परकाळे, शाहू सर्व गोड, किशोर कदम, समाधान भोसले, सतीश सर्व गोड, सिद्धनाथ सावंत, राजेंद्र सर्व गोड, लक्ष्मण बंगाळे तुकाराम भोळवाडी शरद सोनवणे अमोल पाटील गणेश सर्व गोड स्वप्निल कांबळे सुरज साखरे इत्यादी उपस्थित होते.

# रविंद्र कांबळे यांना दर्पण पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पत्रकार/नामदेव निर्मळे : जांभळी तालुका शिरोळ गावचे सुपुत्र व साप्ताहिक इंडियाचा आवाज व न्यूज चॅनेलचे मुख्य संपादक रविंद्र कांबळे यांची पुणे येथील आघाडीची वृत्तसंस्था न्यूज एक्सप्रेसतर्फे उत्कृष्ट पत्रकार म्हणून दिल्या जाणाऱ्या दर्पण पुरस्कारासाठी निवड जाहीर झाली आहे. सदरचा पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथे ७ डिसेंबर २०२४ रोजी होणार आहे.

सर्वसामान्य जनतेच्या व्यथा व अन्याय अत्याचार भ्रष्टाचार यासारख्या अनेक प्रश्नांवर आपल्या लेखणीद्वारे न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न श्री. रविंद्र कांबळे यांनी केला आहे. पत्रकारितेबरोबरच सामाजिक कार्यात ही उल्लेखनीय कार्य करीत आहेत. तसेच सन २०१९ ला साप्ताहिक इंडियाचा आवाजची स्थापना झाली आणि तेव्हापासून ते सन २०२४ पर्यंत चा पत्रकार ते संपादक हा प्रवास करत असताना प्रथम काही वर्ष एका साप्ताहिकांमध्ये पत्रकार म्हणून काम करत असताना काही लोकांच्या व्यथा न मांडता आल्याने एक ठोस भूमिका घेऊन स्वतःच्या वृत्तपत्राची स्थापना केली. तेव्हापासून अतिशय कष्टातून इंडियाचा आवाज या चॅनेल व साप्ताहिकाची स्थापन करून लोकांच्या सेवेसाठी अहोरात्र झटत आहेत आणि हे सर्व करत असताना आपण गोरगरीब दिन दुबळ्यासाठी लढत असतो आणि आपल्या पाठीवरती कुणीतरी कौतुकाची थाप द्यावी तशी थाप या पुणे एक्सप्रेसने संपादक रविंद्र कांबळे यांच्या पाठीवरती दिल्यामुळे कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, रत्नागिरी या परिसरातून अनेक शुभेच्छांचे फोन तसेच मेसेज हे येत असल्याने काम करण्याचा हुरुप मनामध्ये निर्माण झाला असल्याचे पत्रकार परिषदेत रवींद्र कांबळे यांनी सांगितले तसेच पुणे एक्सप्रेस टीमचे ही या निमित्ताने धन्यवाद मांडले.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण कुटुंब भेट अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिरोळ/संजय चव्हाण : राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते मा.ना. एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या संकल्पनेतून युवासेनेच्या पुढाकाराने 'शिवसेना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण कुटुंब भेट अभियान' शिरोळ विधानसभा क्षेत्रातील आलास जिल्हा परिषद मतदारसंघात राबविण्यात आले. अभियानाच्या माध्यमातून योजनेच्या लाभार्थी महिला भगिनी व त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधला.



महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्त्वाखाली अनेक लोकाभिमुख योजना राबविण्यात येत असून त्या योजनांची शिदोरी घेवून युवासैनिकांनी लाडक्या भगिनींची भेट घेतली.

यावेळी युवासेना कार्यकारणी सदस्य मा.शिवाजी जाधवजी युवासेना जिल्हाप्रमुख राकेश खोंद्रे, उपजिल्हाप्रमुख अनिल क्षीरसागर, विधानसभा प्रमुख सचिन पाटील, तालुकाप्रमुख आकाश शिंगाडे, समन्वयक दिग्विजय चव्हाण, उपतालुकाप्रमुख प्रवीण दळवी, रवी कोकणे, शिवकुमार पाटील, सुनिल वग्गे यांच्यासह युवासैनिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण कायद्याअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहित करण्यासाठी 'महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना' राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त पाच हजार रुपये, यापैकी कमी असलेले विद्यावेतन शासनातर्फे अनुज्ञेय आहे. तथापि, राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना आणि महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना अनुज्ञेय ठरणारा विद्यावेतनाचा आर्थिक लाभ एकत्रितपणे देय एकूण विद्यावेतनाच्या ७५ टक्के पेक्षा अधिक अनुज्ञेय ठरणार नाही. ज्यांनी ३ जून २०२१ पासून शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केले आहे किंवा सध्या करीत आहेत, अशा सर्व शिकाऊ उमेदवारांनी https://maps.dvet.gov.in या पोर्टलवर नोंदणी करून त्यांचा महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत दरमहा विद्यावेतन प्राप्त करण्यासाठी अर्ज करावेत. नोंदणी व अर्ज करतांना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास उमेदवारांनी संबंधित आस्थापनांशी किंवा संबंधित मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रांशी संपर्क साधवा. योजनेची तसेच अर्ज करण्याची सर्वंकष माहिती https:// maps.dvet.gov.in या पोर्टलवर देण्यात आली आहे, असे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने कळविले आहे.

# पंढरपूर नगरपरिषदेच्या कर्मचारी मारहाण प्रकरणी लायसन्स इंजिनिअर असोसिएशनतर्फे निषेध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपरिषद येथे नगर रचना सहायक इंजिनीयर सुहास झिंगे यांना झालेल्या मारहाण प्रकरणी लायसन्स इंजिनियर असोसिएशनचे अध्यक्ष इंजिनिअर सारंग कोळी यांनी तीव्र शब्दात निषेध केला. नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी सुनील वाळूजकर यांच्यासमवेत नगरपालिकेचे इंजिनिअर सोमेश धट व सुहास झिंगे यांच्या समवेत याप्रकरणी सविस्तर चर्चा करण्यात आली. एखादे काम सामोपचाराने होत असताना मारहाण करणे हे गैर आहे म्हणुन म्हणून आम्ही लायसन्स इंजिनीयर असोसिएशन तर्फे जाहीर निषेध करीत असून आम्ही सदैव त्यांच्या पाठीशी आहोत अशी काही अध्यक्ष सारंग कोळी यांनी दिली. या प्रसंगी बोलताना उपमुख्य अधिकारी वाळूजकर साहेब यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना जनतेची कामे वेळेत व तत्परतेने करून द्यायच्या सूचना दिल्या. सचिव सोमनाथ काळे ,बाळ कुंभार, पांडुरंग आलोनी , इमरान बेद्रेकर यांनी आपल्या अडीअडचणी मांडल्या व पेंडींग फाईल संदर्भात चर्चा केली. याप्रसंगी सचिन माळवदे ,सचिन पाटील, हनुमंत खिलारे, संतोष रोपळकर ,ललित पाटील ,अमित लाडे ,सचिन धुमाळ ,गोपाळ धोत्रे डी. जे. गव्हाणे, जमीर शेख आदी सर्व इंजिनियर्स उपस्थित होते.

## भानुदासराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

## प्राचार्य ढोकळे यांचे प्रतिपादन

# राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थांनी सेवा करून स्व:त कौशल्य विकास साधावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

लोहारा येथील म.शि.प्र.मंडळ संचलित भानुदासराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य पुरस्कार प्राप्त व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामदास ढोकळे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या व्याख्यानाद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. रामदास ढोकळे यांनी विद्यार्थ्यांना रासेयोचे ध्येय, उद्दिष्ट, महत्त्व, नियम याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले व वर्षभरात होणाऱ्या नियमित कार्यक्रमाचा उहापोह केला. त्याचबरोबर स्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही, मूल्य शिक्षण हे सर्व स्वयं सेवकामध्ये रुजविण्यात रासेयो यशस्वी झाली असून, सामाजिक जाण देणारा, जनजागृती करणारा तसेच राष्ट्र व समाजा प्रती जबाबदारीचे कार्य करणारा रासेयो हा अभिनव उपक्रम आहे, म्हणून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कार्यासाठी आपला सहभाग नोंदवावा असेही त्यांनी यावेळी सांगितले.



यावर्षी वेगवेगळ्या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची उदाहरण देऊन येणाऱ्या काळात स्वयंसेवकाने प्रत्येक शिबिर व कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवून स्वतःचा कौशल्य विकास करावा. असे आव्हानही त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

येणाऱ्या काळात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ही रासेयोची सुविधा महाविद्यालयात उपलब्ध करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवराच्या हस्ते संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. डी. आर. घोलकर हे होते. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. अभिजीत सपाटे व अंतर्गत मूल्यांकन समन्वयक




प्रा.डॉ.प्रशांत माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मोरे एम. एस. यांनी तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र पात्रे व आभार प्रा. डॉ. सरवदे एस.टी.यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील नवरात्र उत्सव मंडळाची कार्यकारणी बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /ता. प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील नवरात्री उत्सव मंडळाची कार्यकारणी निवडीसाठी बैठक घेण्यात आली.

या बैठकीत श्री जय भवानी सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर बिराजदार , उपाध्यक्षपदी राजेंद्र पंचांप्पा लामजणे ,सचिवपदी विलास करके , खजिनदारपदी महादेव बिराजदार ,कार्याध्यक्ष पदी भालचंद्र मातोळे,मिरवणूक प्रमुखपदी प्रताप लामजणे, महादेव भोईटे , बालाजी बिराजदार , महादेव कुंभार यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळाचे मार्गदर्शक युवराज माने , महादेव बिराजदार, भालचंद्र मातोळे,मोहन गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही बैठक घेण्यात आली. या बैठकीत जय भवानी मंडळाचे सदस्य ,बाबासाहेब मुळे, शिवलिंग बिराजदार ,भीमा झुरळे,भीमाशंकर लामजणे,गुंडू करके, संतोष विभुते, जगन्नाथ बिराजदार, सिद्धेश्वर मडोळे, जिवन हेंडले,राजू लामजने, सोमनाथ बिराजदार यांच्यासह आदी सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ 

## थोडक्यात

### महिला व मुलींना सशक्तीकरणास चालना देण्यासाठी रोजगार निर्मितीचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महिला व बाल विकास विभागामार्फत महिला व मुलींना रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, सशक्तीकरणास चालना देण्यासाठी तसेच महिला व मुली यांचा सुरक्षित प्रवास होणे यासाठी पिंक (गुलाबी) ई-रिक्षा ही योजना सुरु केली आहे. सदर योजनेनुसार सोलापूर शहरातील २०० पात्र महिलांना लाभ देण्याचे लक्ष निश्चित केले आहे. या योजनेनुसार ७० टक्के कर्ज बैंकेमार्फत उपलब्ध करुन दिले जाणार असून राज्य शासन २० टक्के आर्थिक भार उचलनार आहे व १० टक्के रक्कम लाभार्थि यांना भरावयाची आहे. पिंक ई-रिक्षा हा महिलांनीच चालवायचा आहे. **या योजनेसाठी पात्रता–** लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असावे,अर्जदार महिलेचे वय २०-४० वर्षे दरम्यान असावे,अर्जदार महिलेचे बैंक खाते असावे, लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. तरी ईच्छुक पात्र महिलांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सी.एस. नं.१६०८/०९, प्लॉट नं.१२ पहिला मजला, शोभा नगर, सात रस्ता, बिग बझारच्या पाठीमागे,सोलापूर येथे अर्जाचा नमूना व अधिक माहिती साठी संपर्क साधावा असे अवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी. यांचे मार्फत करण्यात येत आहे.

### बस मध्ये चढताना तरुणाचा मोबाईल पळवला

सोलापूर : रेल्वे स्टेशन बाहेर असलेल्या बस स्टॉप वरुन तेरामैल येथे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने तरुणांच्या खिशामध्ये हात घालून मोबाईल हिसकावून चोरून नेल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी सकाळी पावणे सात वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी नरेंद्र शितलु (वय-३५,रा.मुपो.उमर,अटवा,जि. उन्नाव,राज्य- उत्तर प्रदेश) याने सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोसई.शिंदे हे करीत आहेत.

# करमाळा तालुक्यातील विकास कामासाठी अधिक निधी देऊ

## आमदार संजय मामा शिंदे यांना निवडून आणा, आदिनाथ मकाई कारखान्याला मदत करू : उपमुख्यमंत्री अजितदादा पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

संजय मामा शिंदे यांना करमाळा विधानसभा मतदारसंघाच्या विकास कामासाठी तीन हजार कोटी रुपयांचा निधी दिला आहे त्यांना निवडून आणा अधिक भरगच्च निधी तालुक्यात विकास कामासाठी निधी देऊ असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी केली.

जनसंवाद यात्रे प्रसंगी झरे येथील कार्यालयातील बोलत होते पुढे बोलताना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार म्हणाली की, या भागातील ऊस आणि ठिकाणी जात आहे येथील कारखाने मकाई यादीत बंद पडला आहे आमदार संजय मामा शिंदे यांना निवडून आणा या कारखान्याला योग्य ते सहकारी भविष्यात केली जाईल शेतकऱ्यांनी काळजी करू नका लाडकी वहिनींमध्ये महिलांनी लाभ घ्यावा विरोधक म्हणतात की योजना बंद पडणार तसे होऊ देणार नाही तुम्ही काळजी करू नका लाडके बहिणीची रक्कम वेळेत तुमच्या खात्यावर पडेल, राज्य शासनाने करमाळा विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांना साठी भरगोस निधी मंजूर केलेला आहे यामध्ये सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा अंतर्गत २८२.७५ कोटी निधी मिळालेली विविध गाणे ३४ कोटी ६८ लाख निधी मंजूर असलेल्या करमाळा शहरातील नवीन प्रशासकीय इमारत व करमाळा तालुक्यातील हॅम अंतर्गत २७१ कोटीचे रस्ते कामाचा समावेश आहे असे पवारांनी सांगितले यावेळी आमदार संजय मामा शिंदे म्हणाले की उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यामुळे करमाळा तालुक्यात दहेगाव योजना पिण्याचे पाण्याची अडचणी व सृष्टी आणि कामे पूर्ण होऊन झाले आहेत पूर्ण होत आहेत उपमुख्यमंत्री पवार यांच्यामुळे ३००० करोड रुपयांचा निधी तालुक्यात मिळाला आहे भविष्यात दादांच्या माध्यमातून तालुक्याचा विकास होणार आहे.

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार करमाळा दौरावर आले होते त्यावेळी तालुक्यातील वीर विकास कामाचे भूमिती व शेतकरी मेळावा महिला मेळावा यांना त्यांनी संबोधित केले व सकाळी ११ वाजता अजित दादा पवार यांचे हेलिकॉप्टरने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये आगमन झाले होते त्यानंतर श्री कमला भवानी देवी मंदिर येथे दर्शन घेऊन येथून बाईक रॅली निघाली होती. एकात्मिक पर्यटन विकास आराखडा जिल्हा सोलापूर अंतर्गत २८२.७५ कोटीच्या कामाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे हस्ते करण्यात आला.**

यावेळी खासदार सुनील तटकरे राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर करमाळा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय मामा शिंदे माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनदादा शिंदे अधिकारी प्रियंका आंबेकर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी अभियंता सुनीता पाटील, उपअभियंता पुंडलिक उबाळे तहसीलदार शिल्पा राठोड व अन्य मान्यवर उपस्थित होते.

महत्त्वाचा जिल्हा आहे पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर पर्यटन पूर्व उद्योग वाढवून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीची आहे त्यामुळे जिल्ह्याचे अर्धव्यवस्थेला वेग येईल तसेच होणारे स्थलांतर थांबण्यास मदत होणार आहे उजनी जल पर्यटन १९० कोटी १९ लाख कृषी पर्यटन १९ कोटी तीस लाख विनायक



पर्यटन ४८ कोटी २६ लाख धार्मिक पर्यटन २५ कुठे असा एकूण २८२ पॉईंट ७५ कोटीचा जिल्ह्यात एकात्मिक विकास आराखडा अंतर्गत विविध विकास कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज करमाळा येथे करण्यात आले

तसेच करमाळा शहरातील विविध उपविभागी कार्यालय तसेच तालुकास्तरीय कार्यालयासाठी नवीन प्रशासकीय इमारतीची आवश्यकता होती हे मराठीसाठी ३४ कोटी ६८ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला असून प्रशासकीय इमारतीच्या कामाची भूमिपूजन श्री पवार यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले त्याचबरोबर राष्ट्रीय विकास महामंडळ हॅम सावडी जिल्हा अहमद तालुका करमाळा वेणेगाव तालुका माढा या ७१ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे कामासाठी २७१ कोटी ५५ लाख निदान होऊन या रस्त्याच्या कामाला शिमारंभ उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी करमाळा विधानसभा मतदारसंघ हे असंख्य महिला गुलाबी कलरच्या फेटा घालून सभास्थळी उपस्थित होती तसेच तालुक्यातील आजी माझी पदाधिकारी सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# करीअर व उशिरा होणारे विवाह तसेच बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याच्या समस्या वाढल्या : डॉ. मीनल चिडगुपकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी

आजकालच्या दगदगीच्या जीवनात व बदललेल्या जीवनशैली मुळेच स्त्री व पुरुषांच्या आयुष्यात वंध्यत्व हे मोठे आव्हान उभे राहिले आहे. करीअर व उशिरा होणारे विवाह तसेच फास्ट फूड व जंक फूड मुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम यामुळेही बरेच समस्या वाढले असल्याचे मनोगत स्त्री रोग तज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर यांनी केल्या .

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था व अपोलो फर्टीलिटी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने न्यासाच्या यात्री निवासातील हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत वंध्यत्व निवारण शिबिरात जेष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर यांनी बोलत होत्या. या कार्यक्रमासाठी अन्नछत्र मंडळाची खूप मोठी मदत मिळाली असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलकाताई भोसले, उपाध्यक्षा रत्नमाला मचाले आणि सचिवा अर्पिताराजे भोसले, न्यासाचे सचिव शामराव मोरे, अपोलो फर्टीलीटीचे व्यवस्थापन अधिकारी डॉ. कीर्ती कटारे तसेच सिनियर आयव्हीएफ कन्सल्टंट डॉ. मीनल चिडगुपकर यांच्या हस्ते श्रींची व धन्वंतरीचे प्रतीमा पूजन करून शिबिराला सुरुवात करण्यात आला.

पुढे बोलताना डॉ. मीनल चीडगुपकर यांनी म्हणाल्या कि, अपोलो फर्टिलिटीमध्ये अतिशय अद्ययावत सोयींनी युक्त अशी सर्व सामान्य लोकांनाही परवडेल अशा माफक दरात खतऋ ची सोय उपलब्ध करून दिली असून, गराजूनी याचा लाभ घ्यावी असे आवाहन त्यांनी केल्या.

तसेच डॉ.कीर्ती कटारे यांनी अपोलोचा कार्याचा थोडक्यात आढावा सांगितला. यावेळी अपोलोची संपूर्ण टीम व हिरकणी महिला बहुद्देशीय संस्थेचे सर्व महिला तसेच लाभार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. अनेक लाभार्थी जोडप्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. कीर्ती कटारे यांनी केले.

## अक्कलकोट तालुक्यातील पालापूर तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर कामात ग्रामपंचायतीने शासनाची केले फसवणूक

### आमदार कपिल पाटील यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चौकशीचे दिले पत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी

मौजे पालापूर तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामात ग्रामपंचायतीचा शासनाची फसवणूक केले असून मौजे पालापूर येथे चालू असलेली तांडा वस्तीत २० लाखाचे काम मंजूर असून सदर कामाचे ई- निवीदा न करता सरपंच/ग्रामपंचायतीने ग्राम पंचायतीच्या नावावर कार्यारंभ आदेश काढून काम करीत असून सदर कामाची चौकशी करण्याबाबत आमदार कपिल पाटील यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी यांना पत्र दिले आहेत.

या प्रकरणाचे संपूर्ण चौकशी होऊन कार्यवाही होई तो पर्यंत कोणतेही बिल अदा करण्यात येऊ नये व सदर ग्रामपंचायतीवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. असे निवेदनात नमूद केले आहेत.

१० लाखांहून अधिक रक्कम व समान प्रकारचे काम असल्याने ई निवीदा करण्यात येणे ही अट बंधनकारक आहे तरी सरपंच/ ग्राम सेवकच्या नावावर कार्यारंभ काढून शासनाची फसवणूक करून काम करीत आहेत असल्याचे माहिती समोर येत असून सदर प्रकरण दाबण्याचा माजी लोकप्रतिनिधी यांच्या मार्फत अधिकारी यांच्यावर दबाव करण्यात येत आहे,

याबाबत योग्य चौकशी करून कार्यवाही न केल्यास कोर्टात जाणार असल्याचे माहिती स्थानिक गावकरी व माजी सरपंच यांनी आमच्या प्रतिनीधी बोलताना सांगितले.

## प्रा. शिवाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा शिवसेनेच्या वतीने शाखाप्रमुखांचा मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शिवसेनेच्या मुख्य कणा हा शिवसैनिक व शाखाप्रमुख असून त्यांच्या अडबळावरचा आजपर्यंत शिवसेनेची यशस्वी वाटचाल चालू आहे त्यामुळे शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा तालुक्यातील शिवसेनेची शाखाप्रमुख, शिवसेने उपदाधिकारी यांचा समन्वय साध्य तसेच पक्ष वाढीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा करण्यासाठी सदर मेळाव्याचे आयोजन किल्लाविषयी येथील खोलेश्वर मंदिर समोरील सभागृहामध्ये आज करण्यात आलेले होते अशी माहिती शिवसेना युवा नेते कुणाल पाटील यांनी माध्यम असे बोलताना दिली यावेळी शिवसेना युवा सेना महिला पदाधिकारी यांनी कुणाल पाटील यांना वरिष्ठांनी करमाळा विधानसभेची उमेदवारी द्यावी अशी मागणी आग्रही केली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना पाटील म्हणाले की सदरचा मेळावा हा मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची यांचे लोकांभिमुख कार्य जनतेपर्यंत पोहोचवण्याबाबत शिवसैनिकांनी कुठेही कमी पडू नये तसेच एका विचाराने सर्वांनी पक्ष वाढीसाठी काम करण्याकरिता शाखाप्रमुख व शिवसैनिक पदाधिकारी यांचा समन्वय साधण्यासाठी सदर मेळाव्याचे आयोजन केले होते. यासाठी शेकडे शिवसैनिक उपस्थित राहिले होते.

करमाळा तालुका व शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो त्यामुळे करमाळा विधानसभेची जागा माहितीमध्ये शिवसेनेला मिळावी याकरिता आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत तसेच लवकरात लवकर करमाळा तालुक्यातील संपूर्ण गावांमध्ये शाखा उद्घाटन कार्यक्रम होणार असून पक्ष मदती करण्यात ते सर्वांनी कामाला लागावे असे ज्या ठिकाणी अडचणी त्या ठिकाणी आम्ही सर्व पदाधिकारी आपले सोबत असू त्यामुळे शेवटच्या घटकापर्यंत पोचून पक्षाची योजना राबवलेली असल्यामुळे यावेळी पाटील यांनी उपस्थित शिवसेनेने केले.

तसेच हातखडा वेबसाईट असोसिएशन किरकोळ काम करून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करणारी व्यक्ती आश्वासित सर्वांना पाठीशी आम्ही ठामपणे उभे राहून कोणीही आपल्याला त्रास देणार नाही याची दक्षता येते अशी आश्वासन यावेळी पाटील यांनी दिली.



यावेळी युवा सेना जिल्हा समन्वय निखिल चांदगुडे शिवसेनेचे महिला तालुकाप्रमुख प्रियांका गायकवाड उपतालुकाप्रमुख लक्ष्मी पोळ व तालुकाप्रमुख दादासाहेब थोरात युवा सेना शहर प्रमुख विशाल गायकवाड यांनी आपली मनोगतिक व्यक्त केली तसेच यावेळी युवा सेना उपजिल्हा श्रीकांत गोसावी युवा सेना उप तालुका प्रमुख दादासाहेब तनपुरे विशाल पाटील मनोज रोकडे युवा सेना जिल्हा तालुकाप्रमुख उपप्रमुख विनोद शिंदे व शहर प्रमुख अनिकेत यादव पवार सहकार समिती तालुका प्रमुख सुरेश गोसावी उपतारा प्रमुख ज्योतीराम काळे सहसचिव श्रीकृष्णा शिंदे तुषार घासणे गणेश रायकर शुभम गोसावी सुमित पवार अमोल लोंढे दत्ता ठोंबरे नंदू पाटील विशाल शिंदे अशोक पाटील निलेश कांबळे मेहरकर कोकाटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### तरुणाच्या डोक्यात चाकूने वार ; एकावर गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) तरुणाच्या डोक्यात चाकूने वार करून त्याला जखमी केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २३ सप्टेंबर रोजी दुपारी दोन ते तीन वाजण्याच्या दरम्यान मिम चौकाजवळील पोल्ट्रीच्या पाठीमागे चंद्रकला नगर नई जिंदगी येथे घडली.याप्रकरणी हसिनाभी जब्बार शेख (वय-५५,रा.मसरे वस्ती) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून सज्जाद सय्यद (पूर्ण नाव माहित नाही) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्य पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहेत.

**स्प्रिंट ४ मानवतावादी प्रकल्पाच्या डव्होकसी कार्यशाळेचे उद्घाटन**

**अप्पर जिल्हाधिकारी मोनिका ठाकूर यांचे प्रतिपादन**

# आपत्ती व्यवस्थापनात प्रजनन आरोग्य सेवांसाठी सर्व संस्थांनी एकत्र यावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : आपत्ती कोणतीही असो त्यात संपूर्ण मानव, प्राणी, पर्यावरणावर परिणाम होतो. त्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाची पूर्वतयारी करणे आवश्यक असते, म्हणूनच शासकीय व अशासकीय सर्व संस्थांनी एकत्रितपणे काम करावे. अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच आरोग्यविषयक सुविधा व समुपदेशन तातडीने पुरविण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाचे गांभीर्य लक्षात घ्यावे असे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी व न्याय दंडाधिकारी मोनिका ठाकूर यांनी केले.

त्या फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने हॉटेल साईप्रसाद या ठिकाणी आयोजित केलेल्या स्प्रिंट ४ मानवतावादी प्रकल्पाच्या डव्होकसी कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी प्रमुख पाहुण्या व उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग सोलापूरचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अधिकारी शक्तीसागर ढोले, सहाय्यक अधिकारी अर्चना बिसोई, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ.एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, माजी अध्यक्ष प्रा. डॉ. नभा काकडे, सदस्या डॉ. विजया महाजन, अक्कलकोट तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, विस्तार अधिकारी आरोग्य विभाग महेश भोरे, पंढरपूर तालुका उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुडके, इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूरचे सचिव जयेश पटेल, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी भगवान भुसारी, जिल्हा सुपरवायझर कृष्णा सकट, इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. किरण सारडा, निमा डॉक्टर्स संघटनेचे डॉ. रविराज गायकवाड, डॉ. सारिका होमकर,सिव्हिल हॉस्पिटल डॉट्स विभाग वरिष्ठ अधिकारी डॉ. ए. एम. सय्यद, सोलापूर महानगरपालिकेच्या ब्युरो विभागाच्या पी. एच. एन. ज्योती कांबळे -शिंदे, युवाप्रतिनिधी अपेक्षा सावंत, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदींसह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया मुख्यालय स्प्रिंट ४ फोर मानवतावादी प्रकल्पाचे राष्ट्रीय व्यवस्थापक डॉ. अमित किटुकले झूम मीटिंगच्या माध्यमातून उपस्थितांना प्रकल्पाविषयी विस्तृत माहिती दिली.




**सर्व संस्थांच्या प्रतिनिधींनी आपल्या मनोगतात संस्थांचे कार्य, आपत्ती व्यवस्थापनात आपली भूमिका स्पष्ट केली. या कार्यशाळेत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर, सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभाग, अक्कलकोट पंचायत समिती आरोग्य विभाग, पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय, सारथी युथ फाउंडेशन, निरामय आरोग्य धाम, निमा, आय. एम. ए. इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर दमाणी रक्त संकलन केंद्र, डॉ. हेडगेवार ब्लड बँक, रॉबिन हूड आर्मी, सखी वन स्टॉप सेंटर, सोलापूर कॅन्सर सोसायटी, पंढरपूर एआरटी विभाग, छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय एआरटी विभाग, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, अग्निशमन विभाग सोमापा, संपूर्ण सुरक्षा कार्यक्रम विभाग, वाय बी एस एस लिंक वर्कर्स प्रकल्प, प्राथमिक आरोग्य केंद्र, कुंभारी आदी सामाजिक संस्था व विविध आरोग्य विभागा सहभागी झाले होते.**

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळगावकर यांनी स्प्रिंट ४ फोर मानवतावादी प्रकल्पाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची व एफ. पी. ए. आयच्या कार्याची माहिती दिली व सर्व संस्थांना या प्रकल्पास सहकार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे स्वागत डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक डॉ. नभा काकडे यांनी केले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. डॉ. आयेशा रंगरेज यांनी मानले.